MHGA090001112026

कि.फौ.मा.कं.१९/२०२६
महा. शासन तर्फे पोलीस स्टेशन चामोर्शी
वि-
अनिकेत गजानन मट्टामी

निशानी कं.१ वर आदेश

प्रस्तुत अर्ज दोषारोपपत्र विलंबाने दाखल होवुन मिळण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. तपासी अधिका-यांनी कथन केले आहे की, प्रस्तुत गुन्हयातील साक्षीदारांनी अज्ञात आरोपीविरोधात बयान दिले होते व गुन्हयातील कागदपत्र मिळुन येत नव्हते. सदर गुन्हयाचे कागदपत्र मिळाल्यानंतर पुढील तपासात साक्षीदारांनी पुरवणी जबाबात कथन केले की, आरोपी अनिकेत मट्टामी हा ट्रक्टर क्रमांक एम.एच.-३३-व्हि.-३३८५, ट्राली क्रमांक एम.एच.-३३-४७३१ हा चालक गुन्हयात कारणीभुत झाला असे सांगीतले. आरोपीला वारंवार सुचना देवुन हजर न झाल्याने दोषारोपपत्र दाखल करू शकले नाही.

आरोपीने हरकत घेतली की, आरोपीने सदर गुन्हा केलेला नाही. प्रस्तुत गुन्हयात बनावट कागदपत्र तयार केले आहे. विलंबाबाबत समाधानकारक कारणे नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. तपासी अधिका-यांनी कथन केले आहे की, साक्षीदारांनी अगोदर अज्ञात आरोपीविरूध्द जबाब दिले होते व त्यानंतर प्रस्तुत आरोपीविरूध्द जबाब दिले आहे. त्यामुळे विलंब झाला आहे. तपासी अधिका-यांनी विलंबाचे दिलेले कारण विचारात घेता गुन्हयातील परिस्थिती विचारात घेता न्यायाच्या दृष्टिने अर्ज मंजुर करून दोषारोपपत्र दाखल करण्यास परवानगी देणे उचित होईल. सबब पुढील प्रमाणे आदेश करण्यात येतो.

# <u>आदेश</u>

चामोर्शी पोलीस स्टेशन गुन्हा क्रमांक १६७/२०२२ संदर्भात दोषारोपपत्र दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2026.03.20 17:06:20 +0530

(वाय.जे.वळवी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.

दि.२०/०३/२०२६